दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. ०२ जून, २०२६ | वर्ष - १ | अंक - २४७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

मंगळवार, दि. २ जून २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, कृष्णपक्ष, द्वितीया संध्याकाळी ७-०२ पर्यंत नंतर तृतीया तिथी, दिवस नक्षत्र– मूळ रात्री १०-०६ पर्यंत नंतर पूर्वाषाढा, चंद्र रास - धनु, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - कर्क

### जमिनीचे तापमान वाढले

**पुणे** : वाढत्या शहरीकरणामुळे पुणे शहराचा पृष्ठभाग प्रचंड तापत आहे. नदीपात्र असलेले जुने भाग तुलनेने कमी गरम होतात. मात्र, जेथे वाहन, लोकसंख्येची घनता आणि सिमेंटचे रस्ते जास्त असे भाग उष्णतेची बेटे बनली आहेत. जुन्या शहरापेक्षा उपनगरे जास्त उष्ण बनत आहेत. त्यामुळेच शहराच्या हवेचे तापमान ३८ अंशांवर असले, तरी जमिनीचे तापमान तब्बल ५८ अंशांवर गेले आहे. त्यामुळे एकूण उष्म्यात वाढ झाली आहे, असे एका अभ्यासातून समोर आले आहे.

## सारांश वृत्त

### दुकानदाराची गोळ्या झाडून हत्या

**फिरोजपूर** : पंजाबमधील फिरोजपूरच्या सीमावर्ती जिल्ह्यातील माखू शहरात सोमवारी दोन अज्ञात हल्लेखोरांनी एका दुकानदाराची गोळ्या झाडून हत्या केली, अशी माहिती पोलिसांनी दिली. मृताची ओळख माखूच्या मुख्य बाजारातील किराणा दुकानाचे मालक गुरचरण सिंग गाबा अशी पटली आहे. मोटरसायकलवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी बाजारात येऊन गुरचरणच्या दिशेने गोळीबार केला.

### कर्नाटकात क्वांटम टास्क फोर्सची स्थापना

**बंगळूर** : कर्नाटकला क्वांटम तंत्रज्ञान आणि नवोपक्रमाचे राष्ट्रीय केंद्र म्हणून स्थापित करण्याच्या उद्देशाने सरकारने 'क्वांटम टास्क फोर्स'ची स्थापना केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान आणि विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने या संदर्भात सरकारी आदेश जारी केल्यानंतर ही घडामोड झाली. क्वांटम इंडिया बंगळूरू शिखर परिषदेत अनावरण करण्यात आलेल्या 'कर्नाटक क्वांटम रोडमॅप'ची रूपरेषा आणि धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी हा कृती दल स्थापन करण्यात आला आहे.

### रांची रेल्वे स्टेशनवर गांजा जप्त

**रांची** : रांची रेल्वे स्थानकावर बिहारमधील तीन जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातून ६१ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे, असे एका अधिकृत निवेदनात सोमवारी म्हटले आहे. आरोपींची ओळख आयुष सिंग (२२), प्रिन्स कुमार (२१) आणि अंकित पाठक (१९) अशी पटली आहे. हे तिघेही बिहारच्या बक्सर जिल्ह्यातील रहिवासी आहेत, असे आरएफपी निवेदनात म्हटले आहे.

महायुती आणि मविआ यांचे उमेदवार ठरले

# विधान परिषदेसाठी उमेदवार निश्चिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषद निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी महायुती आणि महाविकास आघाडीने आपल्या उमेदवारांची यादी जवळपास निश्चित केली आहे. उमेदवार निवडीसाठी गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली रस्सीखेच, बैठका आणि राजकीय घडामोडी अखेर अंतिम टप्प्यात पोहोचल्या आहेत.

यंदा सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, नांदेड, सांगली-सातारा, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, नाशिक, अमरावती आदी १७ मतदारसंघांतील विधान परिषद जागांसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींमार्फत या सदस्यांची निवड केली जाणार आहे. महायुतीमध्ये भाजपने सर्वाधिक ११ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. शिवसेना चार जागांवर, तर राष्ट्रवादी काँग्रेस दोन जागांवर निवडणूक लढवत आहे. भाजपकडून अरुण लखाणी, अविनाश ब्राह्मणकर, प्रवीण पोटे, राजेंद्र राऊत, धैर्यशील कदम, प्राजक्त तनपुरे, सुहास शिरसाट, अमर राजूरकर, बसवराज पाटील, नंदकिशोर महाजन आणि राजीव पोतदार यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

शिवसेनेकडून रवींद्र फाटक, नरेंद्र दराडे, सईद खान आणि दुष्यंत चतुर्वेदी यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून अनिकेत तटकरे यांना उमेदवारी देण्यात आली असून, पुणे मतदारसंघात विक्रम काकडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे.

महाविकास आघाडीत काँग्रेस सर्वाधिक आठ जागांवर निवडणूक लढवत आहे. काँग्रेसने शैलेश देशमुख, हर्षदीप देशमुख, साहेबराव कांबळे, महेश देशमुख, आदित्य फत्तेपूरकर आणि अतुल लोंढे यांना उमेदवारी जाहीर केली आहे.उद्धव ठाकरे गटाकडून अनिल कदम, डॉ. विवेक नावंदर, देवयानी कृष्ण पाटील डोणगावकर, शरद तायडे आणि सुरेंद्रनाथ उर्फ बाळ माने यांना संधी देण्यात आली आहे. तर शरद पवार गटाने पुण्यात श्रीकांत पाटील आणि ठाण्यात अभिजित पवार यांना उमेदवारी दिली आहे.

दरम्यान, काही मतदारसंघांमध्ये उमेदवारीसाठी शेवटच्या क्षणापर्यंत सस्पेन्स कायम राहिला. विशेषतः पुणे, रायगड आणि छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघांमध्ये महायुतीतील इच्छुकांमध्ये चुरस पाहायला मिळाली. अखेर वरिष्ठ नेत्यांच्या हस्तक्षेपानंतर उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली.

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण तापले असून, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळाच्या जोरावर विजय मिळवण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडी दोन्ही आघाड्यांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

# शुभवर्तमान! केरळमध्ये मान्सून दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : मान्सूनच्या प्रतीक्षेत असलेल्या राज्यातील शेतकरी आणि नागरिकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने केरळमध्ये नैऋत्य मान्सून दाखल झाल्याची अधिकृत घोषणा केली आहे. त्यामुळे दक्षिण भारतातून पुढे सरकत मान्सून महाराष्ट्राकडे वाटचाल करणार असला, तरी राज्यातील बहुतांश भागात त्याचे आगमन किमान १० जूनपर्यंत होण्याची शक्यता नसल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, १ जूनपासून राज्यातील अनेक भागांत मेघगर्जनेसह मान्सूनपूर्व पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, खानदेश तसेच काही कोकण भागांत वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळू शकतात. मात्र, हा पाऊस अधिकृत मान्सूनचा नसून मान्सूनपूर्व स्वरूपाचा असल्याचे हवामान तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

मान्सून उशिराने येण्याची शक्यता लक्षात घेता कृषी विभाग आणि मुख्यमंत्री कार्यालयाने शेतकऱ्यांना पेरणीची घाई न करण्याचे आवाहन केले आहे. दमदार पाऊस आणि अधिकृत मान्सून आगमनाची खात्री झाल्यानंतरच पेरणीस सुरुवात करावी, अन्यथा नुकसान होऊ शकते, असा इशारा देण्यात आला आहे. केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याचे घोषित करण्यासाठी पाऊस, पश्चिमेकडील वाऱ्यांचा वेग आणि ढगांच्या स्थितीसंबंधी विशिष्ट निकष पूर्ण होणे आवश्यक असते. यंदा हे निकष पूर्ण झाल्यानंतर मान्सून दाखल झाल्याची घोषणा करण्यात आली.

# सरकारी शाळांतील पटसंख्येत लक्षणीय घट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या गेल्या चार वर्षांत मोठ्या प्रमाणात घटल्याचे शिक्षण विभागाच्या आकडेवारीतून समोर आले आहे.

शिक्षण आयुक्तालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या चार वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील इयत्ता पहिलीची पटसंख्या तब्बल १ लाख ३७ हजारांनी कमी झाली आहे. मात्र, पटसंख्या घटण्याचा वेग काहीसा कमी झाल्याचा दावा शिक्षण विभागाने केला आहे. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात पटसंख्येत ६९ हजार ३६६ विद्यार्थ्यांची घट झाली होती, तर २०२५-२६ मध्ये ही घट २१ हजार २९४ इतकी नोंदवली गेली आहे.

राज्यात गेल्या काही वर्षांत खासगी स्वयंअर्थसहाय्यित शाळांची संख्या झपाट्याने वाढली आहे. विशेषतः सीबीएसई आणि सीआयएससीई यांसारख्या राष्ट्रीय शिक्षण मंडळांशी संलग्न शाळांकडे पालकांचा वाढता कल दिसून येत आहे. इंग्रजी माध्यमातील, आधुनिक सुविधा असलेल्या शाळांमध्ये मुलांनी शिक्षण घ्यावे, अशी पालकांची अपेक्षा असल्याने अनेकजण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांऐवजी खासगी शाळांना प्राधान्य देत आहेत. याचा थेट परिणाम सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील प्रवेशसंख्येवर होत असल्याचे शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

# नीट पुनर्परीक्षा सीबीटी मोडमध्ये घेण्यास नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : २१ जून रोजी होणारी नीट-यूजी २०२६ची पुनर्परीक्षा सध्याच्या लेखी (पेन-अँड-पेपर) पद्धतीऐवजी संगणकाधारित (सीबीटी) पद्धतीने घेण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती अरविंद कुमार यांच्या खंडपीठासमोर राष्ट्रीय जनता दलाचे (राजद) खासदार सुधाकर सिंह यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित वकिलांनी इतर सर्व मागण्या बाजूला ठेवून केवळ पुनर्परीक्षा सीबीटी पद्धतीने घेण्याची मागणी असल्याचे न्यायालयाला सांगितले.

३ मे रोजी झालेली नीट-यूजी २०२६ परीक्षा मोठ्या प्रमाणावर प्रश्नपत्रिका फुटल्याचा संशय निर्माण झाल्यानंतर रद्द करण्यात आली होती. त्यानंतर दाखल करण्यात आलेल्या या याचिकेत नीट परीक्षा पूर्णपणे संगणकाधारित पद्धतीने घेण्यासाठी कालबद्ध आराखडा तयार करण्याची मागणी करण्यात आली होती. याशिवाय, विद्यमान एनटीएच्या जागी तांत्रिक सुरक्षाव्यवस्था, जबाबदारीची स्पष्ट यंत्रणा आणि स्वतंत्र देखरेखीची व्यवस्था असलेली वैधानिक राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरण स्थापन करण्याची मागणीही याचिकेत करण्यात आली होती. निवृत्त सर्वोच्च न्यायालयीन न्यायाधीश, शिक्षणतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ, सायबर सुरक्षा तज्ज्ञ, फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि प्रशासकीय अधिकारी यांचा समावेश असलेली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची मागणीही करण्यात आली होती.

परीक्षा रद्द झाली असून तिचे पुन्हा आयोजन करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत संबंधित यंत्रणांवर मोठा ताण आहे. या टप्प्यावर अशा प्रकारचा आदेश देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे न्यायमूर्ती नरसिंहा यांनी म्हटले. याचिकाकर्त्यांनी केवळ सीबीटी पद्धतीची मागणी कायम असल्याचे पुन्हा नमूद केल्यानंतरही न्यायालयाने तत्काळ सुनावणी घेण्यास नकार दिला आणि प्रकरण सुट्टीनंतर घेण्यात येईल, असे स्पष्ट केले. ही याचिका एनटीएमध्ये सुधारणा करण्यासंदर्भातील इतर प्रलंबित याचिकांसोबत जोडण्यात आली आहे.

दरम्यान, मे महिन्यात झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने नीट-यूजी परीक्षा रद्द होण्याबाबत चिंता व्यक्त केली होती. तसेच माजी इस्रो अध्यक्ष के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सुचविलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत केंद्र सरकार आणि एनटीएकडून अहवाल मागविला होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्टीकरण

# ८० लाख महिला अपात्र झाल्या नाहीत...

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरल्याच्या चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्णविराम दिला आहे. योजनेतून ८० लाख महिलांना वगळण्यात आल्याच्या बातम्या चुकीच्या असल्याचे स्पष्ट करत त्यांनी लाभार्थ्यांची पडताळणी नियमितपणे सुरू असल्याचे सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लाडकी बहीण योजनेसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त झाले होते. अर्जांची छाननी आणि पडताळणी प्रक्रियेदरम्यान काही लाभार्थी निकषांमध्ये बसत नसल्याचे आढळून आले. मात्र, याचा अर्थ लाखो महिला एकाच वेळी अपात्र ठरल्या असा होत नाही. पात्र लाभार्थींना योजनेचा लाभ नियमितपणे दिला जात असून, सरकारकडून पारदर्शक पद्धतीने पडताळणी सुरू आहे. योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान काही अर्जांमध्ये माहितीतील तफावत, दुहेरी नोंदणी किंवा शासनाने निश्चित केलेल्या अटींचे पालन न झाल्याची प्रकरणे समोर आली आहेत. अशा अर्जांची तपासणी करून आवश्यक त्या सुधारणा केल्या जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. विरोधकांकडून योजनेबाबत उपस्थित करण्यात येणाऱ्या प्रश्नांना उत्तर देताना फडणवीस यांनी सांगितले की, राज्य सरकार महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असून पात्र महिलांना कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही. लाभार्थींची संख्या आणि पडताळणीबाबत दिशाभूल करणारी माहिती पसरवू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

ही महिलांसाठीची महत्त्वाकांक्षी योजना असून, तिच्या माध्यमातून पात्र महिलांना आर्थिक सहाय्य दिले जात आहे. योजनेच्या लाभार्थ्यांची पडताळणी आणि माहिती अद्ययावत करण्याची प्रक्रिया पुढील काळातही सुरू राहणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

### संयुक्त राष्ट्र आमसभा अध्यक्षपदासाठी चुरस तीव्र

**नवी दिल्ली** : संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या ८१ व्या सत्राच्या अध्यक्षपदासाठी या आठवड्यात होणाऱ्या निवडणुकीत बांगलादेश आणि सायप्रस एकमेकांविरुद्ध उभे ठाकतील. सप्टेंबरमध्ये सुरू होणाऱ्या आमसभेच्या अधिवेशनाचे नेतृत्व करण्यासाठी बांगलादेशचे परराष्ट्रमंत्री खलीलुर रहमान आणि सायप्रसचे विशेष दूत राजदूत अँड्रियास काकौरिस यांच्यात स्पर्धा आहे. संयुक्त राष्ट्रांची प्रमुख विचारविनिमय करणारी, धोरण-निर्धारक आणि प्रतिनिधिक संस्था असलेल्या आमसभेत, एका वर्षाच्या कार्यकाळासाठी आपल्या पुढील अध्यक्षांची निवड करण्यासाठी २ जून रोजी मतदान होईल.

# म्यानमारने दिला भारताला शब्द

## आमची भूमी भारतविरोधात वापरू देणार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : म्यानमारचे राष्ट्रपती मिन आंग ह्लाइंग यांच्या भारत दौऱ्यादरम्यान भारत-म्यानमार संबंधांना नवी चालना मिळाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत व्यापार, संरक्षण सहकार्य, सीमा व्यवस्थापन आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी म्यानमारने आपल्या भूमीचा वापर भारताच्या सुरक्षेविरोधात होऊ दिला जाणार नसल्याची स्पष्ट ग्वाही दिली.

बैठकीनंतर परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी सांगितले की, दोन्ही देशांमध्ये व्यापार, आर्थिक सहकार्य, संरक्षण, सुरक्षा, सीमा व्यवस्थापन आणि प्रादेशिक घडामोडींवर सकारात्मक चर्चा झाली. भारत आणि म्यानमार यांच्यातील सहकार्य आणखी दृढ करण्यावर दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली आहे. भारत आणि म्यानमार यांच्यात सुमारे १,६०० किलोमीटर लांबीची सीमा आहे. अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर आणि मिझोराम या राज्यांच्या सीमा थेट म्यानमारला लागून आहेत. त्यामुळे सीमावर्ती भागातील सुरक्षा आणि दहशतवादविरोधी सहकार्य भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. पूर्वोत्तर भारतातील काही उग्रवादी संघटनांनी भूतकाळात म्यानमारच्या सीमावर्ती भागांचा आश्रयस्थान म्हणून वापर केल्याचे आरोप होत आले आहेत. या पार्श्वभूमीवर म्यानमारच्या राष्ट्रपतींचे विधान भारतासाठी महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

विश्लेषकांच्या मते, म्यानमारची ही भूमिका चीनसाठीही महत्त्वाचा संदेश आहे. म्यानमार हा चीन आणि भारत यांच्यातील सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा देश मानला जातो. गेल्या दोन दशकांत चीनने म्यानमारमध्ये बंदरे, रेल्वे, महामार्ग आणि ऊर्जा प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे.

सुरक्षा व्यवस्था तसेच कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित

# थेरगाव हॉस्पिटलमध्ये मद्यधुंद व्यक्तीचा धिंगाणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव येथील नव्या रुग्णालयात रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास एका मद्यधुंद व्यक्तीने गोंधळ घालत रुग्ण, नातेवाईक, वैद्यकीय कर्मचारी आणि सुरक्षा रक्षकांना अश्लील शिवीगाळ केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकारामुळे रुग्णालयातील शांतता भंग झाली असून सुरक्षा व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्ती एका रुग्णाला भेटण्यासाठी रात्री साडेअकराच्या सुमारास रुग्णालयात आली होती. पुरुषांच्या जनरल वॉर्डमध्ये असताना तो मोबाईलवर मोठ्याने बोलत शिवीगाळ करू लागला. त्यानंतर संपूर्ण रुग्णालय परिसरात फिरत त्याने उपस्थित रुग्ण, नातेवाईक, महिला कर्मचारी, सुरक्षा रक्षक आणि इतर नागरिकांनाही लक्ष्य करत अशोभनीय भाषा वापरल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. सुमारे अर्धा तास हा प्रकार सुरू होता. परिस्थिती चिघळू नये म्हणून अनेकांनी त्याच्याशी वाद टाळला. मात्र संबंधित व्यक्तीने रुग्णालयाच्या विविध मजल्यांवर फिरत धिंगाणा सुरूच ठेवला. अखेर त्याच्यासोबत आलेल्या नातेवाईकांनी त्याला बाहेर नेण्याचा प्रयत्न केला. तरीही तो सुरक्षा रक्षकांशी हुज्जत घालत शिवीगाळ करत राहिला. घटनेदरम्यान कोणतीही शारीरिक दुखापत झाली नसली, तरी रुग्णालयातील रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. संबंधित प्रकार रुग्णालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेनंतर सुरक्षा रक्षकांनी तत्काळ हस्तक्षेप का केला नाही, तसेच संबंधित व्यक्तीविरोधात पोलिसांत तक्रार का दाखल करण्यात आली नाही, याबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, रुग्णालय प्रमुख डॉ. सोनेकर यांनी या घटनेचा निषेध करत सुरक्षा व्यवस्थेच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. "घडलेला प्रकार गंभीर असून रुग्णालयातील शांतता आणि रुग्णांच्या सुरक्षिततेस बाधा आणणारा आहे. सुरक्षा रक्षकांनी तत्काळ कारवाई करून संबंधित व्यक्तीला बाहेर काढणे आणि आवश्यक असल्यास पोलिसांत तक्रार नोंदवणे अपेक्षित होते. या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही केली जाईल," असे त्यांनी सांगितले.

# टीएमसीच्या दोन आमदारांची हकालपट्टी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : २०२६ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद उघडपणे समोर येऊ लागले आहेत. पक्षविरोधी कारवायांच्या आरोपावरून तृणमूल काँग्रेसने आमदार ऋतब्रत बॅनर्जी आणि संदीपान साहा यांची पक्षातून तात्काळ हकालपट्टी केली आहे.

पक्षाच्या उपाध्यक्ष चंद्रिमा भट्टाचार्य यांनी निवेदनात म्हटले आहे की, संबंधित आमदार पक्षाच्या बैठकींना अनुपस्थित राहिले, पक्षविरोधी भूमिका घेतली आणि पक्षाच्या हिताविरोधात वक्तव्ये केली. या आरोपांची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांनी या प्रकरणावर भाष्य करत तृणमूल काँग्रेसवर गंभीर आरोप केले आहेत. पक्षातील भ्रष्टाचार आता स्वतःच्या आमदारांनाही लक्ष्य करत असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, आमदारांच्या स्वाक्षऱ्यांशी संबंधित कथित गैरप्रकाराबाबत ऋतब्रत बॅनर्जी आणि संदीपान साहा यांनी तक्रारी दाखल केल्याचेही त्यांनी सांगितले. या प्रकरणाचा तपास पश्चिम बंगाल सीआयडीकडून सुरू आहे. तृणमूलचे अभिषेक बॅनर्जी यांनाही चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे. आमदार संदीपान साहा यांनी पक्ष नेतृत्वावर पलटवार करताना आमदारांच्या यादीतील कथित अनियमिततेसाठी अभिषेक बॅनर्जी यांना जबाबदार धरले. उपस्थित नसलेल्या आमदारांच्या स्वाक्षऱ्या दाखविणे ही गंभीर बाब असल्याचा आरोप त्यांनी केला.

## संपादकीय

# स्वस्त पैशाचा अस्त



**जागतिक भांडवल बाजारातील स्वस्त पैशाचे युग आता संपुष्टात आले असून, वाढत्या सार्वभौम रोखे परताव्यामुळे (बॉण्ड यील्ड) भारतासमोरील आर्थिक आव्हाने वाढली आहेत. परदेशी गुंतवणूकदारांची माघार आणि व्याजदरांमधील घटणारे अंतर यामुळे आगामीकाळातफक्तअंतर्गतआर्थिकसुधारणाआणिशाश्वतविकासच भारताला तारू शकेल, हाच या जागतिक घडामोडींचा मुख्य धडा आहे.**

जागतिक वित्तीय बाजारात गेल्या दोन दशकांपासून सुरू असलेला 'क्वांटिटेटिव्ह इझिंग' म्हणजेच सुलभ पतपुरवठ्याचा आणि जवळपास शून्य टक्के व्याजदरांचा कालखंड आता पूर्णपणे इतिहासजमा झाला आहे. आंतरराष्ट्रीय अर्थकारणाच्या दृष्टीने हा अलीकडच्या काळातील अत्यंत कळीचा आणि दूरगामी बदल मानला पाहिजे. २००८ च्या अभूतपूर्व जागतिक वित्तीय अरिष्टानंतर आणि त्यानंतर आलेल्या कोविड-१९ च्या जागतिक महामारीच्या संकटात, जगातील प्रमुख मध्यवर्ती बँकांनी – प्रामुख्याने अमेरिकेची फेडरल रिझर्व्ह, बँक ऑफ इंग्लंड आणि बँक ऑफ जपान – बाजारपेठेत पैशांचा प्रचंड महापूर आणला होता. नवीन चलनाची छपाई करून सरकारी रोखे आणि इतर दीर्घकालीन मालमत्ता खरेदी करण्याचा सपाटा या बँकांनी लावला होता. यामुळे जागतिक बाजारात भांडवलाची अभूतपूर्व सुलभता निर्माण झाली आणि कर्ज घेणे कमालीचे स्वस्त झाले. या कृत्रिम सुलभतेने जगभरातील सरकारांना त्यांच्या वास्तविक क्षमतेपेक्षा जास्त कर्ज घेण्यास प्रवृत्त केले. परंतु, या अतिरेकी पतपुरवठ्यामुळे उद्भवलेली उच्च चलनवाढ आणि अवाढव्य सार्वजनिक कर्ज यांचे भीषण दुष्परिणाम आता उघडपणे समोर येत आहेत. परिणामी, जागतिक स्तरावर सार्वभौम रोख्यांवरील परतावा झपाट्याने आणि अनपेक्षितपणे वाढू लागला आहे. रोख्यांवरील परतावा वाढणे म्हणजे सरकारला नवीन कर्ज उभारण्यासाठी किंवा जुन्या कर्जाचे नूतनीकरण करण्यासाठी बाजारात जास्त व्याज मोजावे लागणे. आज अमेरिका, ब्रिटन आणि जपान सारख्या महासत्ता देशांमध्ये १० वर्षांच्या सरकारी रोख्यांवरील परतावा ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचला आहे. जेव्हा जगात पैसा स्वस्त, सुलभ आणि मुबलक होता, तेव्हा जागतिक भांडवल अधिक परताव्याच्या आशेने उदयोन्मुख बाजारपेठांकडे धाव घेत होते. या 'पुश फॅक्टर' मुळे १९९८-९९ मधील अवघ्या ८.३ अब्ज डॉलर्सवरून २००७-०८ मध्ये भारतात विक्रमी १०७.९ अब्ज डॉलर्सची निव्वळ भांडवली गुंतवणूक झाली होती. त्यानंतरच्या काळातही भारतात दरवर्षी सरासरी ६७.३ अब्ज डॉलर्सचा परदेशी भांडवलाचा ओघ अव्याहतपणे सुरू होता. मात्र, आंतरराष्ट्रीय वित्तीय बाजारातील बदलत्या प्रवाहामुळे आता हे सुवर्णचित्र पूर्णपणे पालटले आहे. वर्ष २०२४-२५ मध्ये हा निव्वळ भांडवली ओघ कमालीचा आटून फक्त १८ अब्ज डॉलर्सवर आला. सध्या भारताच्या १० वर्षांच्या सरकारी रोख्यांवर साधारणपणे ७ टक्के परतावा मिळत आहे, तर अमेरिकेत तो ४.५ टक्के आहे. म्हणजेच, या दोन्ही देशांमधील परताव्यातील फरक फक्त अडीच टक्क्यांवर आला आहे, जो ऐतिहासिकदृष्ट्या ४ टक्क्यांपेक्षा जास्त असायचा. रुपयाचे अवमूल्यन, विनिमय दरातील चढ-उतार आणि अमेरिकन डॉलरची 'सुरक्षित आश्रयस्थान' म्हणून असलेली पत विचारात घेतल्यास, परदेशी गुंतवणूकदारांसाठी भारतीय बाजारातील गुंतवणुकीचे आकर्षण आणि त्यातील फायदा कमालीचा घटला आहे. रिझर्व्ह बँकेने आपल्या वार्षिक अहवालातही या जागतिक अस्थिरतेबद्दल आणि रोखे परताव्यातील वाढीबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. जागतिक पैसा आता स्वस्त राहिलेला नाही आणि तो सहज उपलब्ध होणार नाही, हे कटू वास्तव धोरणकर्त्यांना यापुढे स्वीकारावे लागेल. या अत्यंत आव्हानात्मक आंतरराष्ट्रीय परिस्थितीतून यशस्वीपणे मार्ग काढण्यासाठी भारताला आपल्या अर्थव्यवस्थेत स्वतःचा ठोस आणि विश्वासार्ह 'पुल फॅक्टर' निर्माण करावा लागेल. जागतिक वित्तीय बाजारातील अतिरिक्त पैशाच्या ओघावर विसंबून न राहता, देशांतर्गत पातळीवर व्यापक आर्थिक सुधारणा, उत्पादकता वाढ, पारदर्शक धोरणे, पायाभूत सुविधांचा विकास आणि भारतीय कंपन्यांची दमदार नफाक्षमता यांच्या बळावर जागतिक गुंतवणूकदारांना आकर्षित करावे लागेल. रिझर्व्ह बँकेने रुपयाच्या संरक्षणासाठी परकीय चलन साठ्याचा वापर करून केलेल्या उपाययोजना तात्पुरता दिलासा देऊ शकतात, परंतु ते कायमस्वरूपी उत्तर असू शकत नाही. दीर्घकालीन आर्थिक स्थैर्यासाठी वित्तीय शिस्त, वित्तीय तुटीवर नियंत्रण आणि रचनात्मक सुधारणांशिवाय दुसरा कोणताही सोपा मार्ग उपलब्ध नाही. जागतिक वित्तीय व्यवस्थेतील हे 'महाग पैशाचे' आणि वाढत्या रोखे परताव्याचे नवे पर्व भारताच्या आर्थिक धोरणांची, स्वावलंबनाची आणि राजकीय इच्छाशक्तीची खरी कसोटी पाहणारे ठरेल, यात शंका नाही.

# न्यायाचा वेग आणि व्यवस्थेची गंजलेली चक्रे



**» सर्वोच्च न्यायालयाने निकालपत्रांसाठी निश्चित केलेली कालमर्यादा न्यायिक विलंबाच्या आजारावर जालीम उपाय ठरू शकते; मात्र आदेशांपेक्षा व्यवस्थेच्या मूळ ढाच्यात आमूलाग्र सुधारणा करण्याची गरज आहे.**

भारतीय न्यायव्यवस्थेचे एक न उलगडणारे कोडे म्हणजे इथे न्यायाची अपेक्षा ठेवून येणारा माणूस पिढ्यान् पिढ्या खेटे मारतो, तरीही त्याच्या पदरी अनेकदा निराशाच पडते. 'जस्टिस डिलेड इज जस्टिस डिनाईड' अर्थात 'उशिरा मिळालेला न्याय हा नाकारलेल्या न्यायासारखाच असतो', हे पाश्चात्य कायदेतज्ज्ञांचे सुभाषित आपल्याकडे इतके अंगवळणी पडले आहे की, आता विलंबाचेच सार्वत्रिकीकरण झाले आहे. तारखांवर तारखा मिळण्याची संस्कृती समाजमनात इतकी रुजली आहे की, न्यायालयात जाणे म्हणजे एका अर्थाने अरण्यरुदनच मानले जाते. अशा जड आणि सुस्त झालेल्या व्यवस्थेला सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक कायदेशीर 'शॉक' दिला आहे. उच्च न्यायालये आणि कनिष्ठ न्यायालयांनी सुनावणी पूर्ण झाल्यानंतर निकाल देण्यासाठी निश्चित कालमर्यादा पाळावी, असा अत्यंत महत्त्वपूर्ण आदेश सर्वोच्च न्यायालयाने जारी केला आहे.

आपल्याकडे कायद्याचे राज्य आहे असे आपण जगाला मोठ्या अभिमानाने सांगतो, पण त्याच कायद्याच्या अंमलबजावणीचा वेग एखाद्या सुस्त गोगलगाईलाही लाजवणारा असतो. सर्वोच्च न्यायालयाने आता स्पष्ट शब्दांत फर्मावले आहे की, सुनावणी संपल्यानंतर कमाल दोन ते तीन महिन्यांच्या आत निकालपत्र जाहीर झालेच पाहिजे. न्यायाधीशांनी नुसते खटले ऐकून चालणार नाही, तर ते वेळेत निकाली काढणे हे त्यांचे प्रथम घटनात्मक कर्तव्य आहे, हा या आदेशाचा गाभा. प्रश्न असा पडतो की, देशाच्या सर्वोच्च न्यायालयाला असा आदेश देण्याची वेळ मुळात का यावी? याचे उत्तर आपल्या न्यायालयांमधील प्रलंबित खटल्यांच्या भयंकर आकड्यांमध्ये दडलेले आहे. पाच कोटींहून अधिक खटले सध्या भारतीय न्यायालयांत धूळ खात पडलेले आहेत. अशा वेळी, सुनावणी पूर्ण झाल्यावरही निकाल राखून ठेवण्याची (रिझर्व्ह जजमेंट) आणि त्यावर महिनोन्महिने, किंबहुना वर्षानुवर्षे कुंडली मारून बसण्याची जी एक प्रशासकीय सुस्ती संपूर्ण न्यायव्यवस्थेत आली आहे, त्यावर हा थेट प्रहार आहे.

या समस्येचा दुसरा आणि अधिक गंभीर पैलू समजून घेतला पाहिजे. न्यायाधीशांवर कालमर्यादेचे बंधन टाकून हा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे का? हा निव्वळ वरवरचा उपचार ठरेल. आपल्या न्यायव्यवस्थेचे गणितच मुळात पूर्णपणे व्यस्त आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात न्यायाधीशांची संख्या अत्यंत अपुरी आहे. कनिष्ठ न्यायालयांपासून ते थेट उच्च न्यायालयांपर्यंत आज हजारो पदे रिक्त आहेत.

न्यायालयीन विलंबाच्या या चक्रव्यूहात आणखी एक मोठा खलनायक म्हणजे प्रशासकीय उदासीनता, वकिलांची तहकुबी मागण्याची सवय आणि सरकारी यंत्रणा. न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांपैकी जवळपास पन्नास टक्के खटले हे खुद्द सरकारशी संबंधित असतात. सरकार स्वतःच आज सर्वात मोठे 'खटलेखोर' बनले आहे. कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे किंवा निर्णय घेण्याची जबाबदारी टाळण्याच्या प्रवृत्तीमुळे साधे साधे प्रश्नही थेट न्यायालयात जातात आणि तिथे वर्षानुवर्षे अडकून पडतात. जोपर्यंत सरकार आपल्या या 'तंटेखोर' मानसिकतेत बदल करत नाही, तोपर्यंत न्यायालयांवरील हा अवाढव्य ताण कधीच कमी होणार नाही. तसेच, वकिलांकडून क्षुल्लक कारणांसाठी वारंवार मागितल्या जाणाऱ्या तारखांवरही कडक निर्बंध आणण्याची गरज आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या ताज्या भूमिकेचे कौतुक करतानाच, आपल्याला हे विसरून चालणार नाही की, घाईघाईने दिलेला न्याय हा बऱ्याचदा अन्यायाला आमंत्रण देणारा ठरू शकतो. 'जस्टिस हरीड इज जस्टिस बरीड' हेही तितकेच खरे आहे.

या संपूर्ण प्रकरणाचा मथितार्थ इतकाच की, सर्वोच्च न्यायालयाचा हा चाकोरीबाहेरचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद असला, तरी तो एका मोठ्या शस्त्रक्रियेची सुरुवात मानली पाहिजे, शेवट नव्हे. आपल्याला ई-कोर्ट प्रणाली आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर अधिक व्यापक करावा लागेल. पर्यायी विवाद निवारण यंत्रणा सक्षम करावी लागेल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे न्यायाधीशांच्या भरती प्रक्रियेला युद्धपातळीवर गती द्यावी लागेल. जर या पायाभूत सुधारणा तातडीने झाल्या नाहीत, तर सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेशही इतर अनेक आदेशांप्रमाणे कायद्याच्या पुस्तकातील एक देखणे सुवचन बनून राहील. न्यायव्यवस्थेला 'घड्याळाचा वेग' देण्याचा प्रयत्न करताना, त्या घड्याळाला पुरेशी किल्ली आणि योग्य स्प्रिंग देण्याची जबाबदारी शासन आणि प्रशासन या दोघांचीही आहे, याचे भान सर्व संबंधितांनी ठेवलेले बरे.

# इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या खर्चाचा पालिकेच्या तिजोरीवर भार

## इंधन बचतीच्या नावावर उधळपट्टी होत असल्याचा आरोप

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून गेल्या तीन वर्षांपासून पर्यावरणपूरक धोरणाचा भाग म्हणून इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्यात आला आहे. वायू आणि ध्वनी प्रदूषण कमी करण्याच्या उद्देशाने ही वाहने खरेदी तसेच भाडेतत्त्वावर घेतली जात असली, तरी अपेक्षित खर्च बचत झालेली नसून वाहनांवरील खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धन, ग्लोबल वॉर्मिंग आणि इंधन बचतीच्या नावाखाली महापालिकेकडून उधळपट्टी सुरू असल्याचा आरोप होत आहे.

महापालिकेने आतापर्यंत ५८ इलेक्ट्रिक वाहने भाडेतत्त्वावर घेतली आहेत. चालकाविना एका इलेक्ट्रिक वाहनासाठी दरमहा ४३ हजार ते ५३ हजार ६०० रुपये खर्च होत आहे. तर चालकासह वाहनाचे एका दिवसाचे ठराविक किलोमीटर प्रवासासाठी भाडे १ हजार ९४९ रुपये असून, त्याचा मासिक खर्च एक लाख रुपयांपेक्षा अधिक होत असल्याची माहिती समोर आली आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढल्यानंतरही वाहनांवरील एकूण खर्च दुप्पटीहून अधिक वाढल्याची चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे.

दरम्यान, तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी पर्यावरणपूरक संदेश देण्यासाठी सुरू केलेला सायकल डे उपक्रम आता पूर्णपणे बंद पडला आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सायकलने कार्यालयात यावे, वाहतुकीवरील ताण कमी व्हावा आणि इंधन बचतीचा संदेश जावा या उद्देशाने सुरू करण्यात आलेला हा उपक्रम केवळ छायाचित्रांपुरता मर्यादित राहिल्याची टीका होत आहे. महापौर रवी लांडगे यांनीही सायकल डेची घोषणा केली होती; मात्र त्यालाही पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही.

महापालिकेकडून पर्यावरणपूरक संदेश देण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केला जात असला, तरी महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष आणि इतर पदाधिकाऱ्यांना अद्याप पेट्रोलवरील वाहनेच उपलब्ध करून देण्यात आल्याने पर्यावरणप्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे. अनेक अधिकारी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करत असताना पदाधिकाऱ्यांसाठी वेगळी भूमिका घेतल्याबद्दल टीका होत आहे. आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन केंद्र आणि राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरावर भर देण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यापुढे केवळ इलेक्ट्रिक वाहने खरेदी किंवा भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे भविष्यात वाहनांवरील खर्च आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महापालिकेतील पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांना स्वतःची खासगी वाहने वापरल्यास प्रतिपूर्ती रक्कम दिली जाते. या योजनेअंतर्गत महापौर आणि आयुक्तांना खासगी पेट्रोल वाहनासाठी दरमहा ६६ हजार ९३५ रुपये, तर डिझेल वाहनासाठी ६२ हजार ९३५ रुपये दिले जातात. उपमहापौर, पक्षनेते, विरोधी पक्षनेते, समिती सभापती आणि वर्ग एकच्या अधिकाऱ्यांना पेट्रोल वाहनासाठी ३९ हजार ५६० रुपये, तर डिझेल वाहनासाठी ३६ हजार ५६० रुपये प्रतिमहिना दिले जातात. वर्ग दोनच्या अधिकाऱ्यांना पेट्रोल वाहनासाठी ३३ हजार ३७३ रुपये आणि डिझेल वाहनासाठी ३० हजार ८७३ रुपये प्रतिमहिना देण्यात येतात. या योजनेवर आतापर्यंत कोट्यवधी रुपयांचा खर्च झाल्याची माहिती आहे.

दरम्यान, महापालिकेच्या मालकीची एकूण २६४ वाहने असून १५ वर्षांपेक्षा जुनी किंवा नादुरुस्त झालेली वाहने भंगारात काढण्यात येतात. अशी कालबाह्य वाहने महापालिकेच्या गोदामात साठवून ठेवली जात आहेत.

# जनगणना प्रक्रियेस नागरिकांनी सहकार्य करावे : डॉ. सूर्यवंशी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : जनगणना २०२७ अंतर्गत सुरू असलेली घरसूचीकरण आणि घरगणना प्रक्रिया वेळेत व प्रभावीपणे पूर्ण होण्यासाठी नागरिकांनी प्रगणकांना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

महापालिका हद्दीत १६ मेपासून प्रगणकांमार्फत घरसूचीकरण आणि घरगणना प्रक्रिया सुरू असून स्व-गणना पद्धतीने नागरिकांनी भरलेल्या माहितीची पडताळणी व अंतिम नोंदणीचे काम सध्या सुरू आहे. १ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्व-गणना पूर्ण केलेल्या नागरिकांनी त्यांना प्राप्त झालेला स्व-गणना ओळख क्रमांक (एसई आयडी) प्रगणकांना उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन डॉ. सूर्यवंशी यांनी केले.

स्व-गणना ओळख क्रमांक मिळाल्यानंतरच संबंधित घराची जनगणना प्रक्रिया अंतिम स्वरूपात पूर्ण होऊ शकते. ज्यांनी अद्याप स्व-गणना केलेली नाही, त्यांची माहिती प्रगणकांकडून प्रत्यक्ष भेटीद्वारे नोंदविण्यात येत असून ही प्रक्रिया १४ जून पर्यंत सुरू राहणार आहे. जनगणना ही महत्त्वाची प्रक्रिया असून विकास नियोजनासाठी अचूक आणि विश्वासार्ह माहिती संकलित करण्याचा हा मूलभूत आधार मानला जातो.

# स्वच्छ शहरासाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक पिंपरी-चिंचवड घडविण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असून सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन राबविलेले स्वच्छता उपक्रम शहरासाठी प्रेरणादायी ठरत आहेत, असे मत महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केले.

पिंपळे गुरव येथील पीडब्ल्यूडी मैदान ते डायनासोर गार्डन परिसरात वर्ल्ड मिशन सोसायटी चर्च ऑफ गॉड असोसिएशनच्या वतीने स्वच्छता अभियान आणि पर्यावरण जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महापौर रवि लांडगे यांनी मोहिमेत सहभागी होत स्वयंसेवकांच्या कार्याचे कौतुक केले.




या अभियानात स्वयंसेवक, स्थानिक नागरिक तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. परिसरातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि मोकळ्या जागांमधील कचरा गोळा करण्यात आला. या मोहिमेदरम्यान सुमारे दोन हजार किलोहून अधिक कचरा हटविण्यात आल्याने परिसर अधिक स्वच्छ आणि आकर्षक झाला.


यावेळी बोलताना रवि लांडगे यांनी स्वच्छता ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य असल्याचे सांगितले. नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच स्वच्छ व हरित पिंपरी-चिंचवडचे स्वप्न साकार होऊ शकते. भविष्यातील पिढ्यांना स्वच्छ आणि निरोगी वातावरण मिळावे यासाठी प्रत्येकाने आपल्या परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. या उपक्रमामुळे नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक दृढ झाला असून शहरातील स्वच्छता चळवळीला नवी ऊर्जा मिळाल्याचे चित्र दिसून आले. स्वच्छ आणि हरित पिंपरी-चिंचवडच्या दिशेने हे आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

# चाकण येथे कंटेनर चालकाला अडवून चौघांकडून मारहाण

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**चाकण** : वाहन घासल्याच्या किरकोळ कारणावरून कंटेनर चालकाला अडवून त्याच्यावर दगडाने हल्ला करत मारहाण केल्याची घटना पुणे-नाशिक महामार्गावरील चाकण परिसरात घडली. या प्रकरणी दक्षिण चाकण पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोविंदसिंग भारतसिंग ठाकूर (वय २१, रा. काकराला, जि. कासगंज, उत्तर प्रदेश) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. ही घटना ३१ मे रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास पुणे-नाशिक महामार्गावरील भंडारा हॉटेलसमोरील रस्त्यावर घडली. या प्रकरणी शब्बीर




हमीद सय्यद (वय २७, रा. वाघेवस्ती, चाकण), गणेश रमेश खंदारे (वय २५, रा. आंबेठाण चौक, चाकण), लखन अडप्पा आयगुडे (वय २७, रा. मोशी) आणि कार्तिक शिवाजी पवार (वय १८, रा. चौफुला, पिंपळे जगताप, करंदी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, वाहन घासल्याच्या कारणावरून आरोपींनी फिर्यादीचा कंटेनर अडवला. त्यानंतर एका आरोपीने कंटेनरची काच फोडली. दुसऱ्या आरोपीने वाहनात चढून चालकाच्या छातीवर दगडाने वार केला तसेच त्याला वाहनातून खाली ओढून रस्त्यावर आणले. त्यानंतर इतर आरोपींनी लाथाबुक्क्यांनी आणि दगडाने मारहाण करत शिवीगाळ केली. या हल्ल्यात कंटेनर चालक जखमी झाला असून दक्षिण चाकण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### ट्रकच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**रावेत** : पुनावळे परिसरात भरधाव मालवाहू ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी पहाटे घडली. या प्रकरणी रावेत पोलीस ठाण्यात अज्ञात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कृष्णा घनश्याम शर्मा (वय १८, रा. काळेवाडी, पुणे) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. ३१ मे रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास कृष्णा शर्मा आणि त्यांचा मित्र ओमकार शिखरे हे दुचाकीवरून जेएसपीएम कॉलेज परिसरातून हिंजवडीकडे जात होते. पुनावळे येथील ॲडम व्हिले सोसायटीसमोरील रस्त्यावर मालवाहू ट्रकच्या चालकाने भरधाव आणि निष्काळजीपणे वाहन चालवत त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे दोघेही रस्त्यावर फेकले गेले. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या ओमकार शिखरे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अज्ञात ट्रक चालकाचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. पुढील तपास रावेत पोलीस करीत आहेत.

### कौटुंबिक वादातून फायटरने हल्ला

**पिंपरी** : कौटुंबिक वादातून रिक्षाचालकावर फायटरने हल्ला केल्याची घटना चिंचवड येथील दत्तनगर परिसरात घडली. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सचिन अरुण देवकाते (वय ३८, व्यवसाय रिक्षाचालक) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. ३० मे रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास दत्तीर पाटील चाळ परिसर, दत्तनगर, रामनगर, चिंचवड येथे ही घटना घडली.

फिर्यादीनुसार, फिर्यादी यांच्या सासू संगीता महानवर आणि शेजारील महिलेमध्ये सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर बोलाचाली झाली होती. यावेळी पत्नी रेश्मा देवकाते हिने तिच्या आईला माहेरी जाण्याचा सल्ला दिल्याचा राग आरोपींनी मनात धरला. यानंतर आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ केली. त्यानंतर संदीप महानवर याने हातात फायटर घालून फिर्यादीच्या तोंडावर आणि डोक्यावर वार करत मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या हल्ल्यात सचिन देवकाते जखमी झाले. या प्रकरणी संदीप महानवर (वय २२), संगीता महानवर (वय ४५) आणि रेश्मा देवकाते (वय ३०) यांच्याविरुद्ध पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंपरी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# पिंपरीत भाजीपाला दर स्थिर

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी फळभाज्यांच्या दरात विशेष चढ-उतार दिसून आला नाही. बहुतांश फळभाज्यांचे दर गेल्या आठवड्याप्रमाणे स्थिर राहिले. मात्र, कांदापातची आवक घटल्याने तिच्या दरात वाढ झाली. कांदापातची एक जुडी ५० ते ६० रुपयांना विकली जात होती. तसेच बिन्स, पावटा आणि घेवडा यांच्या दरातही तेजी कायम होती. गवार आणि शेवगा यांच्या दरात घट नोंदविण्यात आली.

पालेभाज्यांच्या दरात किरकोळ वाढ झाली असून कोथिंबीर आणि मेथीच्या जुडीस २५ रुपये दर मिळत होता. गवार आणि शेवगा हे ५० ते ६० रुपये प्रतिकिलो दराने उपलब्ध होते. वांगी आणि फ्लॉवरचा दर ४० ते ५० रुपये प्रतिकिलो होता. मिरची ५० रुपये प्रतिकिलो, तर कांदे १०० रुपयांना पाच किलो दराने विकले जात होते. लसूण १०० ते १५० रुपये आणि आले ८० ते ९० रुपये प्रतिकिलो दराने विक्रीस होते.

रविवारी भाजी मंडईतील प्रमुख फळभाज्यांचे प्रतिकिलो दर पुढीलप्रमाणे होते : गवार ५० रुपये, शेवगा ४० रुपये, टोमॅटो २५ रुपये, भेंडी ५० रुपये, फ्लॉवर ३० रुपये, कोबी २५ रुपये, मिरची ५० रुपये, गाजर २५ रुपये, शिमला मिरची ४० रुपये, लसूण १०० ते १२० रुपये, आले ७० रुपये, वांगी ४० रुपये, काकडी ३० रुपये, कारले ४० रुपये, कांदे २० ते २५ रुपये, बटाटा २५ ते ३० रुपये, बिन्स ७० रुपये, पावटा ७० रुपये, लाल भोपळा ३० रुपये, घोसाळी ५० रुपये, दोडका ३० रुपये, तोंडली ५० रुपये, बीट ३० रुपये आणि घेवडा ८० रुपये.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### चुलत्याचा पुतण्यावर जीवघेणा हल्ला

**आळंदी :** आळंदी परिसरातील अशोकनगर येथे कौटुंबिक वादातून चुलत्याने पुतण्यावर धारदार चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना शनिवारी सायंकाळी घडली. या हल्ल्यात पुतण्या गंभीर जखमी झाला असून आळंदी पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वप्नील सुरेश भोसले (वय ४२) हे पत्नीसमवेत रस्त्याने जात असताना त्यांचे चुलते बाळासाहेब दादू भोसले आणि सुरेखा बाळासाहेब भोसले यांनी त्यांना अडवले. जुन्या कौटुंबिक वादाच्या कारणावरून दोन्ही पक्षांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. वाद वाढल्यानंतर बाळासाहेब भोसले यांनी संतापाच्या भरात धारदार चाकूने स्वप्नील भोसले यांच्यावर हल्ला केला. गळ्याच्या दिशेने करण्यात आलेल्या वारात स्वप्नील भोसले गंभीर जखमी झाले. घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी स्वप्नील भोसले यांनी आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार बाळासाहेब दादू भोसले आणि सुरेखा बाळासाहेब भोसले यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अवैध गावठी दारू अड्ड्यावर धाड

**रांजणगाव गणपती :** निमगाव भोगी येथील शेळके वस्ती परिसरात गावठी हातभट्टीद्वारे सुरू असलेल्या अवैध दारू निर्मितीवर रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत तयार गावठी दारू, दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे रसायन तसेच वाहनासह एकूण १ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी निलेश गुलाब लोंढे (वय ३४, रा. शेवाळे वस्ती, निमगाव भोगी, ता. शिरूर)याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरोधात रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वळसे पाटील आणि ज्ञानेश्वर कटके यांना उमेदवार निवडीचे सर्वाधिकार

# बाजार समिती राष्ट्रवादी ताकदीने लढविणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणगाव गणपती :** ५ जुलै रोजी होणारी शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्ण ताकदीने आणि एकदिलाने लढविणार असल्याचा निर्धार पक्षाच्या तालुकास्तरीय बैठकीत व्यक्त करण्यात आला. या निवडणुकीसाठी उमेदवार निवडीचे सर्वाधिकार माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील आणि शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांना देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस जिल्हा परिषदेचे माजी सभापती मंगलदास बांदल, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रविंद्र काळे, प्रकाश पवार, आंबेगाव-शिरूर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर, जिल्हा परिषद सदस्य प्रफुल्ल शिवले, दादा पाटील फराटे, माजी सभापती शशिकांत दसगुडे, आबाराजे मांढरे, विठ्ठल ढेरंगे, पंचायत समितीचे उपसभापती रामभाऊ सासवडे, आरती भुजबळ, बाबासाहेब फराटे, राजेंद्र जगदाळे, विजय रणसिंग, राजेंद्र गदादे, बबनराव वाळके, विठ्ठल घावटे यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

बाजार समिती ही शेतकरी, व्यापारी आणि सहकार क्षेत्राशी निगडित महत्त्वाची संस्था असून, या संस्थेवर पुन्हा पक्षाचा झेंडा फडकविण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मतभेद आणि गटतट बाजूला ठेवून एकदिलाने काम करावे, असे आवाहन आमदार कटके यांनी केले. आगामी निवडणुकीत पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या विजयासाठी सर्वांनी संघटितपणे काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

बैठकीत निवडणुकीसंदर्भातील अंतिम निर्णय वरिष्ठ नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. दिलीप वळसे पाटील आणि ज्ञानेश्वर कटके यांनी निश्चित केलेल्या उमेदवारांना सर्व इच्छुकांनी आणि पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा देऊन पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही यावेळी सांगण्यात आले.

आता शिरूर तालुक्यामध्ये आणखी एका हायव्होल्टेज निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. अनेक वर्षे बाजार समिती ताब्यात ठेवणारे माजी आमदार अशोक पवार यांच्याकडून मध्यंतरी बाजार समितीवर राष्ट्रवादीने सत्ता काबीज केली होती, त्यामुळे पवार यांच्यापुढे आणखी एक संस्था ताब्यात घेण्याचे मोठे चॅलेंज असणार आहे.

## कांदा प्रश्नावर आज आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** कांद्याला मिळत असलेल्या कवडीमोल दरांमुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, विविध मागण्यांसाठी मंगळवार, २ जून रोजी सकाळी ९.३० वाजता भोरवाडी (अवसरी खुर्द) येथील नंदी चौकात आंबेगाव, जुन्नर, शिरूर आणि खेड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांनी दिली.

कांद्याच्या दरप्रश्नी देवदत्त निकम यांनी यापूर्वी शेतकऱ्यांसह मंचर, आळेफाटा आणि चाकण येथील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये आंदोलन करून कांद्याचे लिलाव बंद पाडले होते. आता पुन्हा एकदा कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी व्यापक आंदोलन छेडण्यात येणार आहे. सध्या कांद्याला मिळणारा दर उत्पादन खर्चही भरून काढत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. कांदा विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून खर्च निघत नसून, अनेक शेतकऱ्यांना वाहतूक खर्चही स्वतःच्या खिशातून करावा लागत असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. या आंदोलनातून कांद्याला प्रतिकिलो २५ रुपये हमीभाव देणे, जानेवारी ते मे या कालावधीत विक्री झालेल्या कांद्याला अनुदान देणे, कांदा निर्यात तातडीने सुरू करणे तसेच शिरूर परिसरात महावितरणकडून सुरू असलेले भारनियमन त्वरित बंद करणे या प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत.

या आंदोलनाला शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार निलेश लंके, खासदार अमोल कोल्हे, आमदार सचिन अहिर, आमदार शरद सोनवणे, आमदार बाबाजी काळे यांच्यासह विविध पक्षांचे नेते उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले. कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलनात सहभागी होऊन आपल्या मागण्यांना पाठिंबा द्यावा, असे आवाहन देवदत्त निकम यांनी केले आहे.

## अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**रांजणगाव गणपती :** शिरूर शहर व परिसरातील राज्य महामार्ग क्रमांक १०३ वरील शासकीय दिशादर्शक फलकांवर अनधिकृतपणे खाजगी जाहिराती लावून सार्वजनिक मालमत्तेचे विद्रूपीकरण केल्याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात चार बांधकाम आणि प्रॉपर्टी संबंधित संस्थांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभाग, शिरूर येथील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक शैलेश दिनकर गाडे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. त्यानुसार शिरूर पोलीस ठाण्यात विविध कलमांसह सार्वजनिक मालमत्तेचे विद्रूपीकरण प्रतिबंध अधिनियम १९९५ च्या कलम ३ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ मे रोजी सकाळी राज्य महामार्ग क्रमांक १०३ वरील माशेरे वस्ती ते शिरूर या दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाने पाहणी केली. यावेळी शासनाने उभारलेल्या दिशादर्शक फलकांवर कोणतीही पूर्वपरवानगी न घेता खाजगी जाहिरातीचे फलक लावण्यात आल्याचे निदर्शनास आले. या अनधिकृत जाहिरातींमुळे अनेक ठिकाणी शासकीय दिशादर्शक फलक अंशतः किंवा पूर्णपणे झाकले गेले होते. त्यामुळे वाहनचालकांना आवश्यक दिशादर्शक माहिती स्पष्टपणे दिसत नसल्याने त्यांचे लक्ष विचलित होऊन अपघाताचा धोका निर्माण झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

पाहणीदरम्यान मंगलमूर्ती वास्तू प्रा. लि.चे १४३, दुर्वांकुर डेव्हलपर्सचे ८, ओमसाई डेव्हलपर्सचे ५ आणि स्वरा प्रॉपर्टीजचा १ असा एकूण १५७ अनधिकृत जाहिरात फलक आढळून आले. शासनाच्या दिशादर्शक फलकांचा अनधिकृत वापर करून सार्वजनिक मालमत्तेचे विद्रूपीकरण केल्याप्रकरणी संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शुभम चव्हाण करीत आहेत.

## ग्रामीण भागात मासवडीच्या जेवणाचा वाढता ट्रेंड

### रांजणीत शेकडो खवय्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** ग्रामीण भागातील पारंपरिक खाद्यसंस्कृतीला पुन्हा एकदा उजाळा मिळत असून गावोगावी मासवडीच्या जेवणाचा ट्रेंड झपाट्याने वाढत आहे. सार्वजनिक कार्यक्रम, धार्मिक सोहळे, अखंड हरिनाम सप्ताह, वाढदिवस समारंभ तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये मासवडीच्या जेवणाला विशेष पसंती मिळत असल्याने हा पारंपरिक खाद्यपदार्थ पुन्हा चर्चेत आला आहे.

पूर्वी घरगुती किंवा मर्यादित स्वरूपात तयार केली जाणारी मासवडी आता व्यावसायिक स्तरावरही बनविली जात आहे. अनेक केटरर्स मोठ्या प्रमाणात मासवडीचे जेवण तयार करून देत असून दोन हजारांहून अधिक लोकांसाठीही सहजपणे भोजन व्यवस्था केली जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील पारंपरिक चवीला नव्याने मागणी मिळत आहे.

मासवडीच्या जेवणात बाजरीची भाकरी, बेसनापासून तयार केलेल्या स्वादिष्ट मासवड्या आणि झणझणीत रस्सा यांचा समावेश असतो. पारंपरिक चव, पौष्टिकता आणि सामूहिक सहभाग यामुळे या भोजनाचे आकर्षण दिवसेंदिवस वाढत आहे.

आंबेगाव तालुक्यातील रांजणी गावातील कारमळा येथे समाज विकास नाट्यमंडळाच्या वतीने नाट्यमंडळातील कलाकार, मंडळाला सहकार्य करणारे देणगीदार आणि प्रेक्षकांसाठी विशेष मासवडी भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून शेकडो खवय्यांनी पारंपरिक भोजनाचा मनसोक्त आस्वाद घेतला. या सामूहिक भोजनासाठी महिलांनी एकत्रितपणे पारंपरिक पद्धतीने बाजरीच्या भाकऱ्या तयार केल्या, तर पुरुषांनी मासवडी आणि झणझणीत रस्सा बनविण्याची जबाबदारी सांभाळली. सर्वांच्या श्रमदानातून तयार झालेल्या या भोजनाचा उपस्थितांनी आनंद घेतला.

ग्रामीण भागातील एकोपा, सहकार्य आणि पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे जतन यांचे हे उत्तम उदाहरण ठरले असून कारमळा येथील या मासवडी भोजनाची परिसरात चांगलीच चर्चा रंगली आहे. पारंपरिक खाद्यपदार्थांना मिळत असलेली वाढती पसंती पाहता आगामी काळात ग्रामीण भागात अशा सामूहिक मासवडी भोजनांच्या आयोजनात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## काळीभोर जांभळांनी बहरली झाडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सध्या जांभळाच्या झाडांवर काळीभोर फळांचा बहर पाहायला मिळत असून बाजारपेठांमध्ये जांभळांची मोठ्या प्रमाणावर विक्री सुरू आहे. औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेल्या जांभळांना ग्राहकांकडूनही चांगली मागणी मिळत असल्याने शेतकरी आणि विक्रेत्यांना आर्थिक दिलासा मिळत आहे.

तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावांमध्ये जांभळाची मोठी झाडे असून दरवर्षी उन्हाळ्याच्या अखेरीस त्यांना भरघोस फळधारणा होते. यंदाही झाडांवर मोठ्या प्रमाणात फळे लागल्याने परिसराचे सौंदर्य खुलून आले आहे. शेताच्या बांधावरील जांभळे काळजीपूर्वक काढून त्यांचे वर्गीकरण व पॅकिंग करून विविध बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी पाठविण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध झाला आहे.

आठवडे बाजारांमध्ये जांभळांच्या विक्रीसाठी विक्रेत्यांची गर्दी दिसून येत आहे. चांगला बाजारभाव मिळत असल्याने विक्रेत्यांनाही समाधानकारक उत्पन्न मिळत आहे. मधुमेह नियंत्रणास मदत करणे, पचनक्रिया सुधारणे आणि शरीराला थंडावा देणे यांसारख्या गुणधर्मांमुळे जांभळांची मागणी वाढली असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

नागापूर येथील शेतकरी दिनकर भागवत यांच्या शेतातील जांभळाच्या झाडाला यंदा भरघोस फळधारणा झाली आहे. रस्त्यालगत असलेल्या या झाडावरील काळीभोर जांभळे प्रवाशांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत. अनेक प्रवासी आणि परिसरातील नागरिक तेथे थांबून ताज्या जांभळांचा आस्वाद घेताना दिसत आहेत. उन्हाळ्याच्या दिवसांत जांभळांनी लगडलेली झाडे निसर्गसौंदर्यात भर घालत असून शेतकरी आणि विक्रेत्यांसाठी उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन ठरत असल्याचे चित्र सध्या आंबेगाव तालुक्यात पाहायला मिळत आहे.

## वाढत्या उन्हात शिक्षकांकडून जनगणनेचे मोलाचे काम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** भारत सरकारच्या जनगणना २०२७ अभियानांतर्गत आंबेगाव तालुक्यात घरसूचीकरण आणि जनगणनेच्या कामाला वेग आला असून शिक्षक-प्रगणक वाढत्या उन्हात दारोदारी जाऊन माहिती संकलन करत आहेत. मात्र हे काम करताना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात जनगणना कार्यासाठी नियुक्त करण्यात आलेले शिक्षक सकाळपासून सायंकाळपर्यंत नागरिकांच्या भेटी घेऊन माहिती नोंदवत आहेत. सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढली असली तरी बहुतांश नागरिक सकाळी किंवा संध्याकाळीच घरी उपलब्ध होत असल्याने प्रगणकांना वारंवार भेटी द्याव्या लागत आहेत. इतर वेळेत नागरिक शेतीकाम किंवा अन्य व्यवसायात व्यस्त असल्याने जनगणनेचे काम वेळखाऊ ठरत आहे. राष्ट्रीय महत्त्वाचे हे काम पार पाडताना उन्हापासून संरक्षणासाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याने शिक्षकांना त्रास सहन करावा लागत आहे. जनगणना कार्यासाठी अनेक शिक्षकांना त्यांच्या मूळ गावाऐवजी इतर गावांमध्ये नियुक्त करण्यात आल्याने घरांची आणि घरमालकांची माहिती शोधण्यासाठी अतिरिक्त मेहनत घ्यावी लागत आहे. अनेक कुटुंबे शेतातील घरांमध्ये वास्तव्यास असल्याने प्रगणकांना शेताच्या बांधांवरून चालत जावे लागत आहे. काही ठिकाणी रस्त्यांची अपुरी सुविधा असल्याने काम अधिक कष्टदायक ठरत आहे. अडचणी असूनही शिक्षक-प्रगणक जनगणना प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे.

## डेरेआंबा नजीक धोकादायक विहिरीला संरक्षण कठडे बसविण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** अवसरी खुर्द-गावडेवाडी मार्गावरील डेरेआंबा एसटी बसथांब्यालगत असलेल्या उघड्या विहिरीमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असून संबंधित विभागाने तातडीने संरक्षण कठडे किंवा सुरक्षा जाळी बसवावी, अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

अवसरी खुर्द, गावडेवाडी आणि अवसरी बुद्रुक यांना जोडणारा हा रस्ता १५ ते २० वर्षांपूर्वी तुलनेने अरुंद होता. त्यावेळी वाहनांची संख्या कमी होती. मात्र गेल्या काही वर्षांत या मार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पहाटे पाच वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत दररोज अडीच ते तीन हजार वाहनांची या रस्त्यावरून ये-जा होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

या मार्गावरून भीमाशंकर साखर कारखान्याचे साखर वाहतूक करणारे ट्रक, दूध टँकर, ट्रॅक्टर, खडी वाहतूक करणारे हायवा, भाजीपाला वाहतूक करणारे टेम्पो, खासगी वाहने तसेच एसटी बसची सतत वर्दळ असते. पूर्वी शेतामध्ये असलेली डेरेआंबा येथील विहीर रस्त्याच्या विस्तारामुळे आता रस्त्यालगत आली आहे. त्यामुळे विशेषतः रात्रीच्या वेळी दोन मोठी वाहने समोरासमोर आल्यास वाहन विहिरीत कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे.

स्थानिक वाहनचालकांच्या मते, अवसरी फाटा ते अवसरी बुद्रुक या रस्त्याचे रुंदीकरण आणि सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम दिवाळीनंतर हाती घेतले जाण्याची शक्यता आहे. त्यावेळी या विहिरीच्या सुरक्षेचा प्रश्नही मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र संभाव्य अपघात टाळण्यासाठी रस्त्याचे काम सुरू होण्याची वाट न पाहता संबंधित विभागाने तातडीने विहिरीभोवती संरक्षण जाळी किंवा मजबूत कठडे उभारावेत, अशी मागणी वाहनचालक आणि ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### पीएमआरडीएला चौकशी करून बांधकाम हटविण्याचे निर्देश

# विश्वशांती गुरुकुलाच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** आळंदी परिसरातील केळगाव (ता. खेड) येथे असलेल्या डॉ. विश्वनाथ कराड यांच्या विश्वशांती गुरुकुल शाळेने नैसर्गिक ओढ्याचा प्रवाह अडवून अनधिकृत बांधकाम तसेच मोठ्या प्रमाणात मुरूम व मातीचा भराव केल्याच्या प्रकरणात खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे पाटील यांनी कारवाईचे आदेश दिले आहेत. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) या प्रकरणाची चौकशी करून मंडळ अधिकाऱ्यांच्या अहवालातील बाबी तथ्य असल्यास संबंधित अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या प्रकरणाचा पाठपुरावा माहिती अधिकार कार्यकर्ते बाळासाहेब चौधरी यांनी गेल्या सहा वर्षांपासून केला होता. त्यांनी पुराव्यांसह उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांच्या न्यायालयात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर झालेल्या सुनावण्यांनंतर उपविभागीय अधिकाऱ्यांनी तहसीलदार प्रशांत बेडसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गटविकास अधिकारी, उपविभागीय जलसंधारण अधिकारी आणि उपअधीक्षक भूमी अभिलेख यांची समिती नियुक्त केली होती.

समितीच्या अहवालानंतर तहसीलदारांनी आळंदी मंडळ अधिकाऱ्यांना स्थळ पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. पाहणीदरम्यान संबंधित शाळेचे इमारत बांधकाम, क्रीडांगण आणि मोकळे पटांगण विकसित करताना शेकडो ब्रास मुरूम व मातीचा भराव टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले. तसेच परिसरातील डोंगर उताराजवळील पाझर तलावाच्या सांडव्यावरील नैसर्गिक ओढा पाईप टाकून बंदिस्त करण्यात आल्याचा उल्लेख अहवालात करण्यात आला आहे.

मंडळ अधिकाऱ्यांनी १० नोव्हेंबर २०२५ रोजी सादर केलेल्या अहवालात नैसर्गिक पाण्याचा प्रवाह अडवल्यामुळे भविष्यात पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका असल्याचे नमूद केले आहे. या परिसरातील शाळेत शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने अशा परिस्थितीत जीवितहानी होण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे.

या अहवालाच्या आधारे तहसीलदार प्रशांत बेडसे पाटील यांनी गुरुवारी (दि. २९) विश्वशांती गुरुकुलाने ओढ्यावर केलेले कथित अनधिकृत बांधकाम पीएमआरडीएमार्फत हटविण्याचे आदेश दिले.

दरम्यान, नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण झाल्याने परिसरातील शेती आणि पर्यावरण धोक्यात आल्याचा दावा माहिती अधिकार कार्यकर्ते बाळासाहेब चौधरी यांनी केला आहे. सहा वर्षांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर कारवाईचे आदेश मिळाले असले, तरी या आदेशांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार याकडे स्थानिकांचे लक्ष लागले आहे.

## श्री भैरवनाथ संस्थेच्या चेअरमनपदी रुक्मिणी वाळुंज



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** श्री भैरवनाथ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, लोणीच्या चेअरमनपदी रुक्मिणी वसंतराव वाळुंज तर उपाध्यक्षपदी तान्हाजी पांडुरंग वाळुंज यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेचे सचिव निवृत्ती सिनलकर यांनी ही माहिती दिली. सर्व संचालकांना नेतृत्वाची संधी मिळावी या उद्देशाने विद्यमान चेअरमन ज्योती जगन लंके आणि उपाध्यक्ष खंडू भिवा माकरे यांनी पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर रिक्त झालेल्या पदांसाठी झालेल्या निवड प्रक्रियेत रुक्मिणी वाळुंज यांची चेअरमनपदी, तर मोरया उद्योग समूहाचे प्रमुख तान्हाजी वाळुंज यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. उपसरपंच राजेंद्र गायकवाड, माजी चेअरमन शरद वाळुंज, दीपक वाळुंज यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक उपस्थित होते. तसेच सरपंच महेंद्रशेठ वाळुंज, कृषी उद्योजक जयेश वाळुंज, राजू वाळुंज आणि बाबाजी वाळुंज यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सारांश वृत्त

### ऑनलाइन बेटिंग रॅकेटचा पर्दाफाश

**हैदराबाद:** तेलंगणा सीआयडीने सोमवारी, आंतरराष्ट्रीय प्लॅटफॉर्म 'दाफाबेट'च्या माध्यमातून अनेक राज्यांमध्ये ऑनलाइन सट्टेबाजीचे संचालन केल्याच्या आरोपाखाली, एका अफगाण नागरिकासह ११ जणांना अटक केली, अशी माहिती पोलिसांनी दिली. करीमनगर येथील एका सॉफ्टवेअर इंजिनिअरने डॅफाबेटच्या प्रचारात्मक मोहिमांना भुलून २०२४ ते जानेवारी २०२५ दरम्यान ऑनलाइन बेटिंगमध्ये ९.९५ लाख रुपये गमावल्याच्या कथित प्रकरणाच्या तपासाअंती ही अटक करण्यात आली आहे.

### कारची कंटेनरला धडक; ३ जण ठार

**आग्रा (उत्तर प्रदेश)** : येथे फतेहाबाद परिसरात आग्रा-लखनौ द्रुतगती मार्गावर सोमवारी एका कारने कंटेनर ट्रकला धडक दिल्याने झालेल्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला आणि पाच जण जखमी झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली. बिहारहून राजस्थानला जाणाऱ्या आठ जणांना घेऊन जाणारी कार द्रुतगती मार्गावर ट्रकला धडकल्याने ही घटना घडली, असे त्यांनी सांगितले. मृतकांची ओळख सुनील (२६), त्याचा मोठा भाऊ शंकर (३०) आणि शंकरची पत्नी प्रीती (२९) अशी पटली आहे, असे त्यांनी सांगितले.

### बेहिशेबी मालमत्ता; अधिकाऱ्याला अटक

**अहमदाबाद** : गुजरात लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरोने (एसीबी) शोधमोहिमेदरम्यान २.६४ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची रोकड, सोने, चांदी आणि इतर मौल्यवान वस्तू जप्त केल्यानंतर, बेहिशेबी मालमत्ता प्रकरणात गुजरात सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याला अटक केली. आरोपी ए. बी. चौधरी हे गांधीनगर येथील उद्योग भवनमध्ये मुख्य विद्युत निरीक्षक म्हणून कार्यरत असलेले वर्ग-१ अधिकारी आहेत, असे एसीबीने सोमवारी एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. त्याच्या ज्ञात उत्पन्नाच्या स्रोतांपेक्षा जास्त मालमत्ता त्याच्या ताब्यात आढळून आली, असे त्यात पुढे म्हटले आहे.

## घुसखोरी आणि दहशतवादावर नियंत्रण

# मे महिन्यात जीवितहानी शून्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरमध्ये मे २०२६ हा महिना दहशतवादी घटनांमुळे कोणतीही जीवितहानी न होता पार पडल्याची नोंद साऊथ एशिया टेररिझम पोर्टलच्या आकडेवारीत करण्यात आली आहे. तीन दशकांहून अधिक काळानंतर प्रथमच मे महिन्यात दहशतवादी हल्ला किंवा घुसखोरीच्या प्रयत्नात कोणाचाही मृत्यू झाला नसल्याने केंद्रशासित प्रदेशातील सुरक्षा परिस्थितीत लक्षणीय सुधारणा झाल्याचे मानले जात आहे.

उपलब्ध आकडेवारीनुसार, यावर्षी जानेवारी ते एप्रिल या कालावधीत दहशतवादाशी संबंधित घटनांमध्ये १२ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामध्ये १० दहशतवादी, एक जवान आणि एका नागरिकाचा समावेश आहे. मात्र मे महिन्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

गेल्या दोन दशकांतील आकडेवारी पाहता मे महिन्यात दहशतवादी हिंसाचारामुळे मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असल्याचे दिसून येते. २००० ते २००६ या कालावधीत मे महिन्यात दरवर्षी शेकडो लोकांचा बळी गेला होता. त्यानंतरच्या काळात ही संख्या सातत्याने घटत गेली असून यंदा ती शून्यावर आली आहे.

सुरक्षा तज्ज्ञांच्या मते, हिवाळ्यानंतर बर्फ वितळल्याने नियंत्रण रेषा आणि आंतरराष्ट्रीय सीमेजवळील मार्ग खुले होत असताना पूर्वी मे महिन्यात घुसखोरी आणि हिंसाचार वाढत असे. मात्र यंदा दहशतवादविरोधी मोहिमा, मजबूत घुसखोरीविरोधी यंत्रणा आणि स्थानिक स्तरावरील भरती रोखण्यात आलेले यश यामुळे परिस्थिती नियंत्रणात राहिली. सुरक्षा अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, दहशतवादी संघटनांच्या प्रमुख कमांडरांचा खात्मा करण्यात आला असून ओव्हर ग्राउंड वर्कर्स नेटवर्क आणि दहशतवादाला सहाय्य करणारी पायाभूत यंत्रणाही मोठ्या प्रमाणात उद्ध्वस्त करण्यात आली आहे. स्थानिक तरुणांची दहशतवादी संघटनांमधील भरतीही आतापर्यंतच्या नीचांकी पातळीवर आली आहे.

दरम्यान, रविवारी पाकव्याप्त काश्मीरमधील २२ वर्षीय झीशान मीर याला नियंत्रण रेषा ओलांडल्याप्रकरणी ताब्यात घेण्यात आले. सोशल मीडियावरून झालेल्या ओळखीमुळे स्थानिक युवतीला भेटण्यासाठी त्याने सीमा ओलांडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्याच दिवशी बारामुल्ला जिल्ह्यातील उरी सेक्टरमध्ये तिघांना ताब्यात घेत घुसखोरीचा कथित प्रयत्नही हाणून पाडण्यात आला. सुरक्षा यंत्रणांच्या मते, दहशतवादविरोधी कारवायांमुळे आणि सातत्यपूर्ण देखरेखीमुळे जम्मू-काश्मीरमधील सुरक्षा वातावरण अधिक स्थिर होत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

# मध्य प्रदेशातही समान नागरी संहिता लागू होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोपाळ** : मध्य प्रदेशात लवकरच समान नागरी संहिता (यूसीसी) लागू करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री मोहन यादव यांनी सोमवारी केली. यासाठी राज्य सरकारने ऑनलाइन सल्ला पोर्टल सुरू केले असून नागरिकांना आपल्या सूचना आणि मते नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री मोहन यादव यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती रंजना प्रसाद देसाई यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय समिती राज्यात यूसीसी लागू करण्याच्या दृष्टीने विविध धार्मिक नेते, सामाजिक संघटना आणि संबंधित घटकांची मते जाणून घेत आहे.

धार्मिक, सामाजिक आणि कौटुंबिक बाबींमध्ये कायदेशीर भेदभावाची गरज नसून समान नागरी संहितेच्या दिशेने वाटचाल करण्याची आवश्यकता असल्याचे यादव यांनी नमूद केले. घटस्फोट, वारसा हक्क, कौटुंबिक परंपरा आणि विविध धार्मिक प्रथांशी संबंधित बाबींमध्ये समानता आणण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. उत्तराखंड आणि गुजरातसारख्या राज्यांनी समान नागरी संहितेसाठी आवश्यक चौकट स्वीकारली असून मध्य प्रदेशही त्याच मार्गाने पुढे जाणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

सध्या समिती राज्यातील विविध जिल्ह्यांचा दौरा करून सर्व समुदायांतील नागरिक, सामाजिक संस्था आणि धार्मिक संघटनांकडून सूचना व अभिप्राय गोळा करत आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर यूसीसी विधेयकाचा मसुदा तयार करण्यात येणार असून शक्य तितक्या लवकर ही संहिता लागू करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचे यादव यांनी स्पष्ट केले. समान नागरी संहितेसंदर्भात सुरू करण्यात आलेल्या संकेतस्थळावर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपली मते नोंदवावीत, असे आवाहनही मुख्यमंत्री मोहन यादव यांनी केले.

# पाच नव्या न्यायाधीशांची नियुक्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात पाच नव्या न्यायाधीशांच्या नियुक्तीला मंजुरी दिली. या नियुक्त्यांनंतर सर्वोच्च न्यायालयातील कार्यरत न्यायाधीशांची संख्या ३७ झाली असून मंजूर ३८ पदांपैकी आता केवळ एक पद रिक्त राहिले आहे.

केंद्रीय कायदा मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, ज्येष्ठ वकील व्यंकटा सुब्रमणियन मोहना यांच्यासह मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर, पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती शील नागू, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती संजीव सचदेवा आणि जम्मू-काश्मीर व लडाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती अरुण पल्ली यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त न्यायाधीश शपथविधी पूर्ण करून औपचारिकरित्या पदभार स्वीकारल्यानंतर या नियुक्त्या प्रभावी होणार आहेत.

दरम्यान, केंद्र सरकारने गेल्या महिन्यात अध्यादेशाद्वारे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची मंजूर संख्या भारताचे सरन्यायाधीश यांच्यासह ३४ वरून ३८ पर्यंत वाढवली होती. या निर्णयानंतर न्यायालयात सहा पदे रिक्त होती. त्यापैकी पाच पदांवर आता नियुक्त्या झाल्याने केवळ एक जागा रिक्त राहिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने २७ मे रोजी या पाच नावांची शिफारस केली होती. त्यानंतर अवघ्या चार दिवसांत केंद्र सरकारने नियुक्त्यांना मंजुरी दिल्याने प्रक्रिया वेगाने पूर्ण झाली.

# अपहृत नागरिकांच्या सुटकेसाठी आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गुवाहाटी** : हिंसाचारग्रस्त मणिपूरमधील कांगपोकपी जिल्ह्यात १३ मे रोजी झालेल्या हल्ल्यानंतर अपहरण करण्यात आलेल्या सहा नागा आणि १४ कुकी नागरिकांच्या तातडीने सुटकेसाठी नागालँडचे मुख्यमंत्री नेफियू रिओ आणि मेघालयचे मुख्यमंत्री कॉनरॅड के. संगमा यांनी आवाहन केले आहे.

युनायटेड नागा कौन्सिलला (यूएनसी) पाठविलेल्या पत्रात मुख्यमंत्री रिओ यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून अपहरण झालेल्या सहा नागा नागरिकांच्या सुरक्षित सुटकेची मागणी केल्याचे सांगितले. भारत सरकारने या प्रकरणाला सर्वोच्च प्राधान्य देत अपहृतांचा शोध, सुटका आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

रिओ यांनी केंद्रीय गृहसचिव तसेच गुप्तचर विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशीही संपर्क साधून तातडीने समन्वित कारवाईची आवश्यकता अधोरेखित केली. तसेच, नागा स्वयंसेवकांच्या ताब्यात असल्याचे सांगितल्या जाणाऱ्या १४ कुकी नागरिकांची सुरक्षित आणि बिनशर्त सुटका करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी यूएनसीला केले.

दरम्यान, मेघालयचे मुख्यमंत्री कॉनरॅड के. संगमा यांनी यूएनसी आणि कुकी इनपी मणिपूर यांना पत्र लिहून नागरिकांच्या अपहरणाबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. कोणत्याही संघर्षात थेट भूमिका नसलेल्या नागरिकांचे अपहरण हे अमानवीय असून त्यामुळे समाजातील दरी आणखी वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.

"माता, मुले आणि वृद्ध भीतीच्या छायेत जीवन जगत आहेत. अशा घटना समाजातील परस्पर विश्वासाला धक्का देतात. सर्व 'ओलिसांची' तात्काळ सुटका करून त्यांची सुरक्षा, वैद्यकीय सेवा, अन्न आणि कुटुंबीयांशी संपर्क सुनिश्चित करावा," असे संगमा यांनी म्हटले आहे.

हिंसाचाराऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन करताना त्यांनी करुणा आणि मानवतेच्या भावनेतून सर्व नागरिकांची सुरक्षित सुटका करण्याची विनंती केली. मणिपूरमधील जखमा भरून काढण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, यापूर्वी अपहरण करण्यात आलेल्या १४ नागा आणि १४ कुकी नागरिकांची सुटका करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, उर्वरित नागरिकांच्या सुरक्षित सुटकेसाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले.

# अभिषेक बॅनर्जी हल्ला प्रकरणी न्यायालयात जाणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात झालेल्या हल्ल्याप्रकरणी ते लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांची भेट घेऊन माहिती देणार असून न्यायालयातही दाद मागणार असल्याची माहिती पक्षाच्या सूत्रांनी सोमवारी दिली.

शनिवारी सोनारपूर येथे निवडणुकीनंतरच्या हिंसाचाराने प्रभावित कुटुंबांची भेट घेत असताना अभिषेक बॅनर्जी यांच्यावर विटा, दगड आणि अंडी फेकून हल्ला करण्यात आला. या घटनेत त्यांच्या डोळ्याला दुखापत झाली. या हल्ल्यामागे भाजपचा हात असल्याचा आरोप करत बॅनर्जी यांनी हा आपल्याला जीवे मारण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. तसेच पोलिसांकडून पुरेसे सुरक्षा संरक्षण मिळाले नसल्याचाही आरोप त्यांनी केला.

घटनेनंतर बॅनर्जी यांनी राजकीय विरोधकांना लक्ष्य केले जात असल्याचा दावा केला. सत्ताधाऱ्यांना पाठिंबा दिल्यास गौरव केला जातो, मात्र प्रश्न विचारणाऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जातो, अशी टीका त्यांनी केली. या प्रकरणी पोलिसांनी आकाश गायेन, काजल दास, देबाशीष दत्ता, निर्मल्या सेनगुप्ता आणि तपन मैती या पाच जणांना अटक केली असून त्यांना सोमवारी बारुईपूर न्यायालयात हजर करण्यात आले.

दरम्यान, भाजपने हल्ल्याचा निषेध केला असला तरी हा प्रकार तृणमूल काँग्रेसविरोधातील जनतेच्या वाढत्या रोषाचे प्रतीक असल्याचा दावा पक्षाकडून करण्यात आला. पश्चिम बंगालचे मंत्री दिलीप घोष यांनी कोणालाही कायदा हातात घेण्याचा अधिकार नसल्याचे सांगत, राज्यातील जनतेच्या मनात सत्ताधारी पक्षाविरोधात मोठा असंतोष निर्माण झाल्याचे म्हटले.

## राज्यसभेत भाजपचा ताकद वाढवण्यावर भर

# काँग्रेससमोर क्रॉस व्होटिंगचे आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : राज्यसभेच्या २५ जागांसाठी १८ जून रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि काँग्रेसने राजकीय हालचालींना वेग दिला आहे. भाजपने राज्यसभेतील आपली ताकद वाढविण्यावर भर दिला असून, काँग्रेससमोर मात्र अनेक राज्यांमध्ये संख्याबळ आणि क्रॉस व्होटिंगचे आव्हान उभे राहिले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या केंद्रीय निवड समितीची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत राज्यसभा निवडणुकीसह विविध राजकीय घडामोडींवर चर्चा करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

भाजपप्रणीत एनडीएला या निवडणुकीनंतर राज्यसभेतील आपली संख्या १५० च्या पुढे नेण्याचा विश्वास आहे. सध्या भाजपकडे १४८ सदस्य असून, २५ जागांपैकी १७ ते १८ जागा जिंकण्याचे पक्षाचे लक्ष्य असल्याचे वृत्त आहे. यंदाच्या निवडणुकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी पंतप्रधान एच. डी. देवगौडा, माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह, केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन आणि रवनीत सिंह बिट्टू यांच्यासह अनेक प्रमुख नेत्यांचा कार्यकाळ संपत आहे.

मध्य प्रदेशात तीन राज्यसभा जागांसाठी निवडणूक होत असून काँग्रेसकडे केवळ एक जागा जिंकण्याइतकेच संख्याबळ आहे. त्यामुळे येथे क्रॉस व्होटिंगची शक्यता व्यक्त केली जात आहे. दिग्विजय सिंह यांनी निवडणूक लढविण्यास नकार दिल्यानंतर काँग्रेससमोर सक्षम उमेदवार निवडण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.

कर्नाटकमध्ये काँग्रेसची स्थिती तुलनेने मजबूत असून पक्षाला तीन जागा जिंकण्याची आशा आहे. त्यापैकी एक जागा मल्लिकार्जुन खरगे यांच्यासाठी महत्त्वाची मानली जात आहे. राजस्थानमध्ये भाजप दोन आणि काँग्रेस एक जागा जिंकू शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, गुजरातमध्ये काँग्रेसला मोठा धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यातील पक्षाचे एकमेव राज्यसभा सदस्य शक्तीसिंह गोहिल यांचा कार्यकाळ संपत असून, अपुऱ्या संख्याबळामुळे काँग्रेस राज्यसभेत गुजरातमधून प्रतिनिधित्व गमावू शकते.

झारखंडमध्ये काँग्रेसच्या आशा झारखंड मुक्ती मोर्चावर अवलंबून आहेत. महागठबंधनकडे दोन जागा जिंकण्यासाठी पुरेसे संख्याबळ असले तरी उमेदवार निवड आणि जागावाटपाबाबत चर्चा सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

# ऊर्जा संकटावरून डी. राजा यांची केंद्रावर टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस डी. राजा यांनी केंद्र सरकारवर ऊर्जा संकट हाताळण्यात अपयशी ठरल्याचा आरोप करत सोमवारी जोरदार टीका केली. वाढत्या इंधन दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे त्यांनी म्हटले.

प्रसारमाध्यमांशी बोलताना डी. राजा म्हणाले की, देशात निर्माण होत असलेल्या ऊर्जा संकटावर प्रभावी उपाययोजना करण्यात केंद्र सरकार अपयशी ठरले आहे. इंधनाच्या किमती सातत्याने वाढत असून त्याचा थेट परिणाम जनतेवर होत आहे. सध्याच्या आंतरराष्ट्रीय भू-राजकीय तणावाशीही त्यांनी या परिस्थितीचा संबंध जोडला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अलीकडील इस्रायल दौऱ्यावरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशातील ऊर्जा सुरक्षेबाबत सरकारने अधिक प्रभावी भूमिका घेणे आवश्यक होते, असे त्यांनी नमूद केले. देशात इंधनटंचाईची भीती आणि वाढत्या किमतींमुळे नागरिक त्रस्त असल्याचा दावाही त्यांनी केला. व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या दरात वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर डी. राजा यांनी ही प्रतिक्रिया दिली. नव्या दरांनुसार १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमतीत ४२ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. तसेच ५ किलोच्या फ्री ट्रेड एलपीजी सिलेंडरच्या दरातही ११ रुपयांची वाढ झाली आहे. मात्र, घरगुती एलपीजी सिलेंडरच्या किमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. या दरवाढीचे समर्थन करत उत्तर प्रदेशचे मंत्री आणि सुहेलदेव भारतीय समाज पक्षाचे प्रमुख ओम प्रकाश राजभर यांनी साठेबाजीला आळा घालण्यासाठी सरकार वेळोवेळी अशा उपाययोजना करत असल्याचे सांगितले. साठेबाजी रोखण्याच्या दिशेने हे आणखी एक पाऊल असल्याचे त्यांनी म्हटले.

जागतिक ऊर्जा बाजारात अस्थिरता निर्माण झाली असताना भारतातील ऊर्जा पुरवठ्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. मात्र, केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाने देशात पेट्रोल, डिझेल, एलपीजी आणि नैसर्गिक वायूचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले आहे.

# रोख वेतनावर तेलंगणात बंदी

**हैदराबाद** : तेलंगणाने सोमवारी लागू झालेल्या नवीन कामगार प्रशासकीय चौकटीअंतर्गत रोख वेतन देण्यावर बंदी घातली आहे आणि गिग व प्लॅटफॉर्म कामगारांना किमान वेतनाचे संरक्षण दिले आहे, ज्यामुळे राज्यभरात वेतनाचे नियमन करण्याच्या पद्धतीत बदल झाला आहे. शासकीय आदेशाद्वारे करण्यात आलेल्या या बदलांमुळे, केंद्राच्या वेतन संहिता, २०१९ च्या तरतुदी तेलंगणामध्ये कार्यान्वित झाल्या असून, किमान वेतन कायदा, १९४८ ची जागा घेतली आहे.

# राहुल गांधींचा मोदींवर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सीबीएसईच्या ऑन-स्क्रीन मार्किंग वादावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. या प्रकरणावर पंतप्रधानांचे मौन हे केवळ उदासीनता नसून "सहभागीपणा" असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.

राहुल गांधी यांनी दावा केला की, सीबीएसईच्या उत्तरपत्रिका स्कॅनिंग प्रक्रियेत गंभीर त्रुटी झाल्या असून सुमारे १८.५ लाख विद्यार्थ्यांवर त्याचा परिणाम झाला आहे. त्यांच्या मते, सुरुवातीच्या निविदेत स्वयंचलित रोबोटिक स्कॅनर, ३०० डीपीआय रिझोल्यूशन आणि उत्तरपत्रिकांची मूळ बांधणी जतन करण्याच्या अटी होत्या. मात्र, नंतरच्या सुधारित निविदेत या अटी बदलण्यात आल्या आणि त्यामुळे उत्तरपत्रिका स्कॅनिंगमध्ये गोंधळ निर्माण झाला.

रविवारी झालेल्या 'मन की बात' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंब्यांच्या विविध जातींचा उल्लेख केला होता. राहुल गांधी यांनी टीका करत म्हटले की, "पंतप्रधानांकडे आंब्यांबद्दल बोलण्यासाठी वेळ आहे, पण उत्तरपत्रिका मोबाईल फोनने स्कॅन करण्यात आल्याचा आरोप असलेल्या लाखो विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर बोलण्यासाठी वेळ नाही."

याआधीही राहुल गांधी यांनी सीबीएसईच्या एसएसएम प्रणालीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. काही विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान त्यांना दाखवण्यात आलेल्या उत्तरपत्रिका त्यांच्या नसल्याचा दावा केला होता.

## सागरी खाद्य निर्यात ७२ हजार कोटींच्या विक्रमी उच्चांकावर

# कोळंबीला जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोची** : भारतीय कोळंबीला जागतिक बाजारपेठेत मिळत असलेल्या वाढत्या मागणीमुळे देशाच्या सागरी खाद्यपदार्थांच्या निर्यातीने २०२५-२६ या आर्थिक वर्षात विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. सागरी उत्पादनांची निर्यात ८.४६ अब्ज डॉलर्स (सुमारे ७२ हजार कोटी रुपये) या आतापर्यंतच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचली असून, देशाने १९.७२ लाख टन सागरी उत्पादनांची निर्यात केली आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत निर्यातीच्या प्रमाणात १६.१३ टक्के, तर डॉलर मूल्याच्या दृष्टीने १३.४४ टक्क्यांची वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील विविध आव्हानांवर मात करत भारतीय सागरी खाद्य क्षेत्राने ही उल्लेखनीय भरारी घेतली आहे.

सागरी उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाच्या (एमपीईडीए) माहितीनुसार, गोठवलेल्या कोळंबीचा निर्यातीतील सर्वाधिक वाटा राहिला आहे. भारताने ७.९३ लाख टन गोठवलेल्या कोळंबीची ५.६२ अब्ज डॉलर्स मूल्याची निर्यात केली असून, एकूण सागरी निर्यात उत्पन्नात याचा ६६ टक्क्यांहून अधिक वाटा आहे. भारतीय कोळंबीची सर्वाधिक निर्यात अमेरिकेला झाली असून, २.५६ लाख टनांहून अधिक कोळंबीची खरेदी अमेरिकेने केली आहे. चीन हा दुसरा सर्वात मोठा ग्राहक देश ठरला आहे. याशिवाय युरोपियन युनियन, आग्नेय आशियाई देश आणि जपान या बाजारपेठांमध्येही भारतीय कोळंबीला मोठी मागणी आहे.

कोळंबीच्या विविध प्रकारांमध्ये एल. व्हॅनामेई या जातीचे वर्चस्व कायम राहिले आहे. तर ब्लॅक टायगर कोळंबीच्या निर्यातीत प्रमाण आणि मूल्य या दोन्ही बाबतीत ४० टक्क्यांहून अधिक वाढ नोंदविण्यात आली आहे. ब्लॅक टायगर कोळंबीसाठी चीन आणि युरोपियन युनियन या प्रमुख बाजारपेठा ठरल्या.

गोठवलेल्या माशांच्या निर्यातीनेही चांगली कामगिरी केली असून, मूल्याच्या दृष्टीने हा दुसरा सर्वात मोठा निर्यात विभाग ठरला आहे. तसेच सुक्या सागरी खाद्यपदार्थांच्या निर्यातीतही मोठी वाढ झाली आहे. सुक्या माशांची निर्यात ४.१ लाख टनांच्या पुढे गेली असून, प्रमाणात ६२ टक्के आणि उत्पन्नात जवळपास ७० टक्क्यांची वाढ झाली आहे.

सागरी निर्यातीत विशाखापट्टणम बंदराचा सर्वाधिक वाटा राहिला असून, जवाहरलाल नेहरू बंदर दुसऱ्या क्रमांकावर आहे.

कोची हे सागरी खाद्यपदार्थांच्या निर्यातीचे तिसरे मोठे केंद्र म्हणून उदयास आले असून, एकूण निर्यात उत्पन्नात त्याचा सुमारे १० टक्के वाटा आहे. भारतीय सागरी खाद्यपदार्थांना मिळत असलेली वाढती जागतिक मागणी आणि निर्यातीतील विक्रमी वाढ यामुळे या क्षेत्राच्या भविष्यासाठी सकारात्मक चित्र निर्माण झाले आहे.